पुढारी

# वाघ अभियांत्रिकीच्या करिअर शिबिरास प्रतिसाद

**नाशिक :** क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने अभियांत्रिकी, फार्मसी तसेच कृषी क्षेत्रातील करिअरच्या संधी : नियम व प्रवेशप्रक्रिया मार्गदर्शन व चर्चासत्रात ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. रावसाहेब थोरात सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, आयटी विभागप्रमुख डॉ. प्रीती भामरे, ढगे यांची उपस्थिती होती. डॉ. जी. बी. दाभाडे यांनी आभियांत्रिकी शिक्षणातील संधी, प्रवेशासाठी करावयाची ऑनलाइन नोंदणी, महाविद्यालयांची निवड, प्रवेश फेरी आदींबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर डॉ. सारिका माळोदे यांनी फार्मसी प्रवेशप्रक्रिया आणि करिअरच्या संधी यावर प्रकाश टाकला. डॉ. एन. जी. देवशेटे यांनी कृषी क्षेत्रातील करिअर संधी आणि कृषी शिक्षणक्रम प्रवेशप्रक्रिया याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. किशोर साळुंखे यांनीही औषधनिर्माणातील संधी, प्रक्रिया याबद्दल संवाद साधला. संस्थाध्यक्ष समीर वाघ, सचिव के. एस. बंदी यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी प्रास्ताविकात वाघ अभियांत्रिकी महाविद्यालातील उपलब्ध शिक्षणक्रमांविषयी माहिती दिली.

Nashik Edition

Jul 22, 2025 Page No. 04

Powered by: erelego.com